# ख्रिस्ती लोक गटांमध्ये आणि घरांत एकत्र जमतात

मुलांना शिकविणाऱ्यांनी H6b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** “प्रिय प्रभु येशू, तुझ्या स्वत:च्या पुनरुत्थानाने तू आम्हाला जिवंत केलेस. जिवंत शरीरूपी मंडळी या नात्याने आम्हाला अनेक कन्या, नाती, पणती निर्माण करण्यास आमचे साहाय्य कर.”

**1. तुमच्या मंडळीला लहान गृह मंडळ्यांमध्ये काम करण्यासाठी मदत करण्याकरिता तयारी करा.**

- पाहा **प्रे.कृ. 2:46 व 47; 18:7** मध्ये आरंभीचे ख्रिस्ती लोक कोणत्या ठिकाणी एकत्र जमत असत?
- पाहा **प्रे.कृ. 2:46** मध्ये विश्वासणारे प्रभुभोजन कोठे घेत? *(त्यांच्या घरांमध्ये)*
- पाहा **प्रे.कृ. 5:42;20:20** मध्ये प्रेषितांनी येशूविषयी कोठे शिक्षण दिले? *(मंदिरात व घरांमध्ये)*
- पाहा **प्रे.कृ. 16:40** मध्ये प्रेषित फिलिप्पै मधील विश्वासणाऱ्यांना शोधण्यास कोठे गेले? *(लुदियाच्या घरी)*

**पाहा प्रे. कृ. 16:40; रोम 16:5; 1 करिंथ 16:19; कलस्सै 4:15-16; फिलेमोनाला पत्र 1-3** मध्ये प्रेषित पौलाने पत्र लिहिली त्या अनेक मंडळ्या कोठे एकत्र जमत. (लोकांच्या घराघरात)

काही मंडळ्या ह्या मोठ्या हत्तींसारख्या बळकट असतात आणि पुष्कळ काम करण्याची त्यांच्यात क्षमता असते. इतर मंडळ्या ह्या लहानशा सशांप्रमाणे असतात. त्या फारशा बलवान नसल्या तरी वेगाने बहुगुणित होतात.



| **हत्ती** | **ससे** |
|---|---|
| • वयाच्या 16 व्या वर्षी वयात येतात | • जन्मल्यापासून 4 महिन्यात वयात येतात |
| • एक वेळी एकच पिल्लू होते., | • एका वेळी सुमारे 7 पिल्ले होतात. |
| • एक वर्षात चार वेळा वीण होते. | • बहुतेक नेहमीच वितात. |
| • गर्भधारणेचा काळ 22 महिने. | • गर्भधारणेचा काळ 1 महिना. |
| • तीन वर्षामध्ये कुटुंबात 2 ते 3 हत्तींची भर पडते. | • तीन वर्षात कुटुंब 476 दशलक्षानी वाढते. |



**2. नवीन गृहमंडळ्या कशा स्थापन करायच्या याविषयी तुमच्या सहकाऱ्याबरोबर योजना आखा.**

गृहमंडळ्यांच्या काही फायद्यांविषयी तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करा:

- त्या मोठ्या गटांपेक्षा अधिक सहजपणे बहुगुणित होतात.
- नवशिक्या मेंढपाळ पाळकांना याचे पुढारीपण करता येते.
- ते प्रत्येकाने त्यांच्या त्यांच्या आध्यात्मिक कृपादानाने एकमेकांला प्रोत्साहन देण्याविषयी जागरूक असतात.
- त्यांना नव्या करारातील “एकमेकांविषयीच्या” सर्व आज्ञा प्रत्यक्षात आणता येतात.
- त्यांना इमारतीसाठी पैसा लागत नाही.
- ते बहुतेक विरोधी लोकांच्या दृष्टीसही पडत नाहीत.

तुम्ही आणि तुमचे सहकारी गृहमंडळ्यांची सेवा करणाऱ्या नवशिक्या मेंढपाळ पाळकांना कशा प्रकारे मार्गदर्शन करणार याबाबत चर्चा करा.

"नवीन मेंढपाळ पाळकांना मार्गदर्शन करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे" A0g हा पौल तीमथ्य पुढारी प्रशिक्षण अभ्यास वाचा.

तुमचे सहकारी कदाचित नवशिके मेंढपाळ पाळक होतील. त्यांच्याशी चर्चा करा. त्यांची भेट घेऊन ते नव्या गृहमंडळ्यांचे पुढारीपण करताना त्यांना प्रशिक्षण द्या. उत्तम मेंढपाळ पुढील गोष्टींतून पुढे येतील:

- जे आपल्या कुटुंबांचे उपासनेत पुढारीपण करतात.
- इतरांना एकत्र आणण्याची ज्यांच्यात क्षमता आहे.
- आपआपल्या समाजात ज्यांचा चांगला नावलौकिक आहे.

नव्या गृह गटांना नवशिक्या मेंढपाळांना मदत करता यावी याकरिता त्यांना प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमांची योजना आखा:

- देवाची उपासना करणे.
- येशूच्या नावाने प्रार्थना करणे.
- नवीन विश्वासणाऱ्यांचा बाप्तिस्मा करणे.
- एकत्र येऊन भाकरी मोडणे.
- तातडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दान देणे.
- एकत्रितपणे शास्त्र लेखांचा अभ्यास करा.
- एकत्रेकांना प्रोत्साहन द्या.
- इतरांनी सांगा.
- 
- इतर गृहगटांशी सहकार्य करा.

गृहमंडळ्यांनी मोठ्या सभांमध्ये कोठे आणि किती वेळा एकत्र यावे याची योजना आखा, त्यांनी शक्य असल्यास पुढील गोष्टींसाठी एकत्र यावे...

- पवित्र शास्त्राचे शिक्षक आणि कृपादान मिळालेल्या उपदेशकांचे ऐकणे.
- देव त्यांच्या लहान गटांमध्ये काय कार्य करीत आहे त्याबद्दल इतरांना सांगणे.
- कुशल संगीतकारांचे संगीत ऐका आणि नवीन गाणी शिका.
- इतर विश्वासणाऱ्यांना भेटा आणि मैत्रीचे नाते जोडा.
- संधी कोणत्या आहेत समजून घ्या आणि नव्या सेवाकार्यांच्या योजना आखा.
- देवाची स्तुती करा आणि अधिकाऱ्यांसाठी प्रार्थना करा.

**इशारा:** मोठे गट वरचेवर एकत्र आले तर मग काही विश्वासणारे गृह मंडळ्यांमध्ये येण्याचे थांबवतील.

**3. आगामी उपासना सभेविषयी तुमच्या सहकाऱ्यांबरोबर योजना आखा.**

सध्याच्या गरजांनुरूप कार्यक्रम निवडा.

मुलांना त्यांनी तयारी केलेली नाटिका व प्रश्न सादर करण्यास सांगा.

भाग 1 मधील मुद्दे स्पष्ट करून प्रश्न विचारा.

विश्वासणाऱ्यांना एकत्र येऊन कोणत्या प्रकारचे कार्यक्रम करता येतील त्याविषयी 1 करिंथ 14:26–32 मधून वाचन करा.

विश्वासणाऱ्यांना त्यांच्या कुटुंबांत आणि गृहमंडळ्यांमध्ये करता येतील अशा कार्यक्रमांचा सराव करा.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी 1 करिंथ 11:18–34 वाचा.

**पाठ करा मत्तय 18:20**

तीन वा चार विश्वासणाऱ्यांचा गट करा. एकमेकांचे ऐका आणि एकमेकांकरिता प्रार्थना करा.

तुम्ही नव्या मेंढपाळांना प्रशिक्षण देत असाल आणि अद्याप पौल तीमथ्य अभ्यास A0f नवशिक्या मेंढपाळांना प्रशिक्षण देणाऱ्यांसाठी मार्गदर्शकतत्वे, हा अभ्यास वाचला नसेल तर कृपा करून आता वाचा.



*If you train new shepherds and have not yet read P_T study A0f Guidelines for Trainers of Novice Shepherds, then please do so now.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net